मा. राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, रा.ग्रा.स्व.अ., महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.57/ 019, दिनांक -29 मे 2019

**निविदा सूचना**

प्र.क्र.राग्रास्वअ/लेखा/राअदौ/ 1680 /2020
राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान
जिल्हा परिषद, गोंदिया
दिनांक- 03/03/2020

**प्रति,**

........................................................
........................................................
........................................................

**विषय :-राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत** अंतर्गत राज्यांतर्गत 38 अधिकारी/कर्मचारी व पदाधिकारी यांच्या अभ्यास दौरा आयोजित करावयाचा असल्याने (प्रवास, निवास, भोजन तथा भेटी व्यवस्थेसह) दरपत्रके मागविण्याबाबत.

आपणास या व्दारे कळविण्यात येते की, "राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान" जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत जिल्हयातील 38 अधिकारी व पदाधिकारी यांचा राज्यातंर्गत अभ्यास दौरा कार्यक्रम आयोजित करावयाचा आहे. त्या नुसार जिल्हा परिषद नंदूरबार अंतर्गत ग्रा.प. न्यूबन आणि ग्रा.प. सिंगसपूर ता. तळोदा तसेच जिल्हयातील इतर आदर्श ग्रा.प. ला भेटी दयावयाचे आहे. त्याकरीता गोंदिया ते नंदूरबार व परत नंदूरबार ते गोंदिया यामध्ये प्रवास व्यवस्था (रेल्वेने)अल्पोपहार, चहा, भोजन मिष्ठानासह तथा निवासासहित संपूर्ण व्यवस्था अभ्यास दौऱ्या दरम्यान करावयाची आहे. सदरहू अभ्यास दौरा 3 दिवसीय असून माहे मार्च 2020 मध्ये आयोजित करावयाचे आहे. दरपत्रक सिलबंद पाकीटात दिनांक- 09.03.2020 ला ठिक दुपारी 3.00 वाजेपर्यंत या कार्यालयात पोचतिल या बेताने सादर करावे. वेळेनंतर आलेल्या निविदा स्वीकृत केल्या जाणार नाही. निविदा दिनांक- 09.03.2020 ला ठिक दुपारी 4.30 वाजता उघडण्यात येईल. निविदा उघडतांना आपण किंवा आपल्या प्रतिनिधी समोर उघडण्यात येईल.

| अ.क्र. | दिवस | विवरण |
|---|---|---|
| १ | १ ला दिवस | गोंदिया ते नंदूरबार-प्रवास-रेल्वेने (३ tyer ac आरक्षित किंवा उपलब्ध नसल्यास Sleeper coach आरक्षित)<br>नाष्टा - १ वेळा, चहा/ कॉफी - १ वेळा, जेवण - १ वेळा, |
| २ | २ रा दिवस | नंदूरबार रेल्वे स्टेशन ते पंचायत समिती, ग्रामपंचायत व इतर भेट प्रवास - (वातानूकुलित बसने)<br>नाष्टा - १ वेळा, चहा/कॉफी - २ वेळा, जेवण - २ वेळा (Lunch & Dinner), निवासाची व्यवस्था |
| ३ | ३ रा दिवस | नंदूरबार ते गोंदिया -प्रवास-रेल्वेने (३ tyer ac आरक्षित किंवा उपलब्ध नसल्यास Sleeper coachआरक्षित)<br>नाष्टा - २ वेळा, चहा/ कॉफी - २ वेळा, जेवण - १ वेळा |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

1.कमीत कमी दराची दरपत्रके स्वीकारण्यात येतील.
2. वरील पुरवठा पंचायत विभागाच्या मार्गदर्शकाप्रमाणे करावा लागेल.
3. निविदेत नमुद केलल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही देयक अदा करण्यात येणार नाही.
4. दरपत्रके नाकारण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) जि.प.यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.
5.ज्यांचे दरपत्रक मान्य करण्यात येतील त्यांनी मान्य दराचे 10 टक्के सुरक्षा ठेव जमा करावे. सदर सुरक्षा ठेव दौरा पुर्ण होताच परत करण्यात येणार. जर पुरवठा दाराकडून दौरा रद्द झाल्यास सदर सुरक्षा ठेव परत करण्यात येणार नाही.
6. जिल्हा परिषद नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे तसेच वेबसाईटवर अपलोड करण्यात आली आहे.
7. नियमानुसार कर कपात करण्यात येईल.
8. पुरवठादाराकडे व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड आणि GST क्रमांक असणे आवश्यक आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचा)
जिल्हा परिषद गोंदिया

**प्रतिलीपी :-** 1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना माहीतीस्तव सविनय सादर.
2. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना माहीतीस्तव समादाराने सादर.